जा. क्र– / सशिअ / शि / बांधकाम / 129
कार्यालय, शिक्षण विभाग 2014–15 ,
महानगरपालिका, नागपूर
दि. 23 /07/ 2014

कार्यालयीन परिपत्रक

## सन 2014–15 मध्ये सर्व शिक्षा अभियान अंतर्गत बांधकामे पुर्ण करण्याबाबत.

सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत सन 2013–14 पर्यंत मोठया प्रमाणात विविध प्रकारची बांधकामे भारत सरकारने मंजुर केली आहेत. त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतुद मंजुर करुन निधी उपलब्ध करुन दिला आहे.बहुतांश मंजुर झालेली बांधकामे पुर्ण करण्यात आली असुन काही बांधकामे प्रगतीपथावर व सुरु न झालेल्या स्थितीत आहेत.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 नुसार प्रत्येक शाळा शिक्षण हक्क कायदयाशी अनुरुप ( RTE COMPLIANT ) असणे आवश्यक आहे. प्रगतीपथावरील बांधकामे पुर्ण करणे व सुरु न झालेली बांधकामे सुरु करण्यासाठी Deferred Liablility अंतर्गत सन 2014–15 मध्ये तरतुद मंजुर केली आहे. तसेच प्रगतीपथावरील कामांसाठी Spillover आर्थिक तरतुद मंजुर केली आहे.

1) **Deferred Liablility अंतर्गत पुर्ण करावयाची बांधकामे** :– सन 2013–14 पुर्वी मंजुर झालेल्या परंतु अद्यापही सुरु न झालेल्या बांधकामांना सन 2014–15 मध्ये Deferred Liablility तरतुद मंजुर झाली आहे.

अ) मुलांचे स्वच्छतागृह – भौतिक – 58 एकक किंमत रु 1.00 लक्ष प्रती
ब) पिण्याच्या पाण्याची सुविधा – भौतिक – 73 एकक किंमत रु 5000/– प्रती

2013–14 यु डायस माहितीनुसार अद्यापही काही शाळांमध्ये या सुविधा उपलब्ध नसल्याने शासनाने निदर्शनास आणुन दिले आहे.तरी निकषानुसार पडताळणी करुन आवश्यकता असल्यास परिपुर्ण प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रासह व झोन स्तरावरील अभियंता यांच्या शिफारसीसह या कार्यालयास तात्काळ सादर करावे. तसेच ज्या स्वच्छतागृहांना दुरुस्ती करुन वापरण्यायोग्य करणे शक्य नाही अशा ठिकाणी मुलामुलींकरीता स्वतंत्र स्वच्छतागृह बांधकामांना प्रशासकीय मान्यता घ्यावी .या बाबतचेही प्रस्ताव तात्काळ योग्य चाकोरीतून या कार्यालयास सादर करावे.

तरी अद्यापही सुरु न झालेली बांधकामे तातडीने सुरु करुन विहीत मुदतीत ती पुर्ण करण्यात येईल या संदर्भात तात्काळ कार्यवाही करावी.

उपायुक्त
महानगरपालिका नागपुर

प्रति
मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
...................................................

प्रत – माहितीस्तव सादर
1) मा राज्य प्रकल्प संचालक,मप्राशिप मुंबई
2) मा आयुक्त मनपा नागपुर
3) मा अपर आयुक्त मनपा नागपुर

प्रत – माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव
1) शिक्षणाधिकारी मनपा नागपुर
2) सहायक आयुक्त (सर्व झोन )..............................
3) कनिष्ठ अभियंता (बांधकाम सर्व झोन)...................
4) लेखाधिकारी मनपा नागपुर
5) सहायक कार्यक्रम अधिकारी (सशिअ) मनपा नागपुर